**मे. श्रीमती फैमिदा परवीन बी. खान, वांजरी लाईमस्टोन व डोलोमाईट खाण, गट नं. ३९९, ४०० व ४४८, वांजरी, ता. वणी, जि. यवतमाळ, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित वाढीव उत्पादन क्षमता ३५,००० टन/वर्षे (डोलोमाईट-५३२४० टन/वर्षे + लाईमस्टोन-२४८२२३ टन/वर्षे) ते ३०१४६३ टन/वर्षे व प्रकल्प क्षेत्र २५.६० हेक्टर प्रकल्पाच्या प्रस्तावाबाबत पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत**

---

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | २२/०६/२०२२ |
| वेळ | : | दुपारी ०२:०० वाजता |
| स्थळ | : | प्रकल्प स्थळ, मे. श्रीमती फैमिदा परवीन बी. खान, वांजरी लाईमस्टोन व डोलोमाईट खाण, गट नं. ३९९, ४०० व ४४८, वांजरी, ता. वणी, जि. यवतमाळ |

**प्रस्तावना:-**

मे. श्रीमती फैमिदा परवीन बी. खान, वांजरी लाईमस्टोन व डोलोमाईट खाण, गट नं. ३९९, ४०० व ४४८, वांजरी, ता. वणी, जि. यवतमाळ, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित वाढीव उत्पादन क्षमता ३५,००० टन/वर्षे (डोलोमाईट-५३२४० टन/वर्षे + लाईमस्टोन-२४८२२३ टन/वर्षे) ते ३०१४६३ टन/वर्षे व प्रकल्प क्षेत्र २५.६० हेक्टर प्रकल्पाच्या उभारणीबाबतच्या पर्यावरणविषयक प्रस्तावाबाबत प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण अनुमती (Environment Clearance) प्राप्त करण्यासाठी आवश्यक असलेला प्रकल्प स्थानाच्या परिघातील १०.० कि.मी. परिघातील पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल (EIA) तयार करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालयातील राज्य स्तरीय तज्ज्ञ मुल्यांकन समिती (SEAC-I) यांना टीओआरसाठी अर्ज सादर केला व त्यास १९८व्या बैठकीत दिनांक ०७/०५/२०२१ रोजी आणि राज्य पर्यावरण आघात मुल्यांकन प्राधिकरणाने (SEIAA) त्यास २२१ व्या बैठकीत दिनांक २७/०५/२०२१ रोजी सदर प्रस्तावित प्रकल्पास मान्यता दिलेली आहे.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार प्रकल्प स्थानाच्या १० कि.मी. परिघातील पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत पर्यावरण जाहिर जनसुनावणी आयोजित करणे व त्यात प्रकल्पग्रस्त, स्थानिक लोक यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी उपस्थित केलेले पर्यावरणीय मुद्दे अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात समाविष्ट करण्याचे निर्देश दिले. तसेच सदरहू प्रकल्प हा संवर्ग बी-१ मध्ये मोडत असून पर्यावरण अनुमती ही महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाकडून प्राप्त करणे आवश्यक आहे.

मे. श्रीमती फैमिदा परवीन बी. खान, वांजरी लाईमस्टोन व डोलोमाईट खाण, गट नं. ३९९, ४०० व ४४८, वांजरी, ता. वणी, जि. यवतमाळ, महाराष्ट्र यांनी पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे दिनांक २९/०३/२०२२ रोजी अर्ज सादर केला. म.प्र.नि.मंडळ चंद्रपूर व जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्या समन्वयाने जिल्हाधिकारी चंद्रपूर,

महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक २२ जून, २०२२ रोजी प्रत्यक्ष (physical) पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यास मान्यता दिली. त्याचप्रमाणे सदरहू जनसुनावणी ऑनलाईन घेण्याचीही सूचना केली.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बैठकीच्या ३० दिवस अगोदर जाहिर जनसुनावणीची सूचना एक स्थानिक वृत्तपत्रात स्थानिक भाषेत व एक राष्ट्रीय वृत्तपत्रात इंग्रजीमध्ये प्रकाशित करणे बंधनकारक असल्याने उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ चंद्रपूर यांनी स्थानिक वृत्तपत्र पुण्यनगरी यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र टाइम्स ऑफ इंडिया यात इंग्रजीत दिनांक १९/०५/२०२२ रोजी जाहिर सूचना प्रकाशित केलेली होती. त्यात ऑनलाईन जनसुनावणीसाठीचा बैठक नंबर व बैठक पासवर्ड उपलब्ध करण्यात आलेला होता. त्यात नियोजित प्रकल्पामुळे परिसरातील रहिवाशी, पर्यावरणविषयक कार्यरत संस्था, सदर प्रकल्पामुळे विस्थापित होणारे रहिवाशी किंवा सदर प्रकल्पामुळे अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवाशी यांना सदर प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक, विचार, टीकाटिप्पणी, सूचना किंवा आक्षेप जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून जनसुनावणीच्या तारखेपर्यंत स्थानिक चंद्रपूर कार्यालयात लेखी वा ईमेलव्दारे सादर करण्याचे आवाहन करण्यात आलेले होते. त्यानुसार उप प्रादेशिक कार्यालय, चंद्रपूर यांनी एक लेखी आक्षेप प्राप्त झालेला आहे.

या प्रकल्पाबाबत तयार करण्यात आलेला प्रारुप पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांश अहवाल इंग्रजी व मराठीत खालील अधिसूचित कार्यालयात नागरिकांच्या अवलोकनार्थ व माहितीसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेला होता:-

१) क्षेत्रीय कार्यालय, पश्चिम मध्य झोन, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, न्यु सेक्रेटरिएल बिल्डिंग तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर
२) पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, १५वा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
३) सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईंट, 3रा माळा, पीव्हीआर सिनेमागृहासमोर, सायन सर्कलजवळ, सायन पूर्व, मुंबई – ४०० ०२२
४) प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रस्ता, चंद्रपूर,
५) उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रस्ता, चंद्रपूर
६) जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ,
७) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ,
८) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, यवतमाळ,
९) उप विभागीय अधिकारी, उप विभागीय कार्यालय, वणी, ता. वणी, जि. यवतमाळ,
१०) मुख्य अधिकारी, नगर परिषद, वणी, ता. वणी, जि. यवतमाळ,
११) तहसीलदार, तहसील कार्यालय, वणी, ता. वणी, जि. यवतमाळ,
१२) पंचायत समिती कार्यालय, वणी, ता. वणी, जि. यवतमाळ,
१३) ग्रामपंचायत कार्यालय, वांजरी, ता. वणी, जि. यवतमाळ

१४) ग्रामपंचायत कार्यालय, मजरा, ता. वणी, जि. यवतमाळ
१५) ग्रामपंचायत कार्यालय, वडगांव टीप, ता. वणी, जि. यवतमाळ
१६) ग्रामपंचायत कार्यालय, राजूर, ता. वणी, जि. यवतमाळ
१७) ग्रामपंचायत कार्यालय, कळमना खु., ता. वणी, जि. यवतमाळ
१८) ग्रामपंचायत कार्यालय, निंबाळा, ता. वणी, जि. यवतमाळ
१९) ग्रामपंचायत कार्यालय, नांदेपेरा, ता. वणी, जि. यवतमाळ
२०) ग्रामपंचायत कार्यालय, झोला, ता. वणी, जि. यवतमाळ

वरिल अनुक्रमांक ११ ते २० वर नमुद अधिसुचित शासनाच्या विभागांनादेखील त्यांनी त्यांच्या स्तरावर सदरहू पर्यावरणविषयक जनसुनावणीबाबत व्यापक प्रसिध्दी देण्याबाबत कळविण्यात आलेले होते. अशा प्रकारे जाहिर जनसुनावणीबाबत अधिसुचनेमध्ये नमुद केलेल्या पध्दतीचा अवलंब करुन व्यापक स्वरुपात प्रसिध्दी देण्यात आली, जेणेकरुन प्रकल्पबाधित किंवा संबंधित व्यक्तींना त्यांचे विचार, टीकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप संबंधित विभागास नोंदविणे सोईचे होईल.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेनुसार सदरहू जनसुनावणी ही प्रकल्पा स्थानावर आयोजित करण्यात आलेली होती.

पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दिनांक 14 सप्टेंबर, २००६ च्या पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेनुसार सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी कार्यालयीन आदेश ई-३६/२०२२ व्दारा पत्र क्रं. बीओ/जेडी (ड्बल्युपीसी) पीएच/बी-२२०५३०-एफटीएस-०२४९ दिनांक ३०/०५/२०२२ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली:-

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हादंडाधिकारी, यवतमाळ<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी<br>(अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा<br>कमी दर्जाचा नसावा) | - | **अध्यक्ष** |
| २) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई<br>यांचे प्रतिनिधी - प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर | - | **सदस्य** |
| ३) उप प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर | - | **आयोजक** |

या कार्यालयास उपरोक्त प्रकल्पाबाबत १२ सूचना, तक्रारी, निवेदने, आक्षेप प्राप्त झालेले असून संबंधित व्यक्ती/संस्था यांना जनसुनावणीस उपस्थित राहून त्यांच्या सूचना सूचना, तक्रारी, निवेदने, आक्षेप उपस्थित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

जनसुनावणी दरम्यान उपस्थितांचे हजेरीपट तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर जाहिर जनसुनावणी घेण्यासाठी गठित केलेल्या समितीचा आदेश सहपत्र-२ प्रमाणे सोबत जोडलेले आहेत.

**<u>जनसुनावणीचे इतिवृत्तः-</u>**

जनसुनावणीच्या सुरवातीस श्री अतुल सातफळे, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ. चंद्रपूर तथा आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री ललितकुमार वराडे, अपर जिल्हादंडाधिकारी, यवतमाळ तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री अ. मा. करे, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ. चंद्रपूर तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्पाचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरण क्षेत्रातील कार्यरत विविध संस्था व मोठया संख्येने उपस्थित स्थानिक यांचे स्वागत करुन जनसुनावणीच्या कार्यपध्दतीबद्दल माहिती दिली. त्यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणविषयक सूचना, विचार, आक्षेप उपस्थित करण्याचे आवाहन केले. त्यांनी सांगितले की सदरहू जनसुनावणी ही स्थानिक, प्रकल्पग्रस्त यांच्यासाठीच आयोजित करण्यात आलेली असून, जेणेकरून पर्यावरणविषयक प्रश्न, शंका यांचे निरसन होईल.

आयोजक यांनी सांगितले की सदरहू समिती ही उपस्थितांचे प्रस्तावित प्रकल्पाविषयीचे पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप नोंदविण्यासाठी असून सदरहू समितीस प्रकल्पास मंजूरी देणे, नाकारणे वा शिफारस करण्याचा अधिकार नाही. बैठकीत उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेपांची नोंद घेण्यात येऊन त्याचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येऊन ते अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना यांच्यासह अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, म.प्र.नि.मंडळ ह्याच्या तर्फे महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागास यांना सादर करण्यात येते. तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते.

त्यांनी सांगितले की अधिसूचनेतील तरतुदींनुसार सदरहू बैठकीचे छायाचित्रिकरण व व्हिडीओ शुटींग करण्यात येत असून सादरीकरणानंतर उपस्थितांना आपले प्रश्न, सूचना, विचार, आक्षेप शांतपणे मांडावेत. त्यास प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार किंवा प्रकल्प प्रवर्तक उत्तर देतील. प्रश्न विचारताना प्रथम आपले संपूर्ण नांव व गाव सांगण्यात यावे.

आयोजक यांनी अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांना प्रस्तावित प्रकल्पाचे पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत (Environment Management Plan) सादरीकरण करण्याची सूचना केली.

प्रकल्प अधिकारी यांनी प्रकल्पाचे विस्तारिकरण व पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत (Environment Management Plan) सादरीकरण मराठी भाषेत केले. सादरीकरणात प्रामुख्याने खालील बाबी स्पष्ट करण्यात आल्याः-

- प्रकल्पाबाबतची सविस्तर माहिती

- प्रकल्पाचे क्षेत्रफळ, अक्षांश-रेखांश,नकाशा, बुडित क्षेत्र, लाभक्षेत्र, वन क्षेत्र,प्रकल्पाचे वैशिष्ट्ये,प्रकल्पाचे महत्व, परिणाम, जमीन वापर, भूकंप स्थिरता,
- प्रकल्पाचा उद्देश, सामाजिक स्थिती, रोजगाराची संधि, शेतक-यांच्या प्रकल्पामुळे होणारा विकास,
- प्रकल्पाचे विश्लेषण, सारांश, निष्कर्ष
- सामाजिक व आर्थिक स्थितीचे विश्लेषण
- हवा, पाणी, जमीन, ध्वनी, विस्थापन इ.बाबतची माहिती,
- नियोजित प्रकल्पामुळे हवा,पाणी,विस्थापन,जैवविविधता यावर होणारे परिणाम व व्यवस्थापन
- प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर केले जाणारे पर्यावरण व्यवस्थापन याबाबतची माहिती
- इतर पर्यावरण व्यवस्थापन विषयीची माहिती

आयोजक यांनी उपस्थितांना त्यांचे प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पाविषयी काही विचार, टीकाटिप्पणी, सूचना किंवा आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले. सदरहू जनसुनावणी ही पर्यावरणविषयक असल्याने पर्यावरणविषयकच प्रश्न उपस्थित करण्याची व सूचना, आक्षेप नोंदविताना प्रथम आपले संपूर्ण नांव व गाव सांगण्याची सूचना केली.

**<u>जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीकाटिप्पणी, आक्षेप, सूचना तसेच प्रकल्प प्रवर्तकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने खालीलप्रमाणे:-</u>**

१) **श्री अमोल महादेव कुंभारे,उपसरपंच, वांजरी, तालुका-वणी, जिल्हा-यवतमाळ-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | त्यांनी आक्षेप नोंदविताना सांगितले की खाण मालकांकडून जमा करण्यात येत असलेला जिल्हा खाण निधी (District Mining Fund) हा त्या त्या गावातील सरपंच, उपसरपंच यांना विश्वासात घेऊनच विविध योजनांवर खर्च करण्यात यावा. | पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की श्री अमोल कुंभारे यांनी डीएमएफ म्हणजे District Mining Fund बाबत प्रश्न विचारला आहे. प्रत्येक टनामागे १०% रॉयल्टी ही डीएमएफला जाते. जिल्हाधिकारी, यवतमाळ याच्या अखत्यारित तो निधी असतो. प्रकल्प प्रवर्तकांचा त्या विनियोगाबाबत काहीही संबंध येत नाही. |
| २) | खाण मालकांकडून वर्षाला किती निधी जमा होतो, त्याची माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. | प्रत्येक टनामागे १०% रॉयल्टी ही डीएमएफला जाते. जिल्हाधिकारी, यवतमाळ याच्या अखत्यारित तो निधी असतो. प्रकल्प प्रवर्तकांचा त्या विनियोगाबाबत काहीही संबंध येत नाही. |
| ३) | वनविभाग, वणी पांढरकवडा यांनी स्थानिक शेतक-यांकडून माहिती न घेता वणीपासून १० कि.मी. वन्यजीव नाही अशी माहिती पर्यावरण | पर्यावरण सल्लागार सांगितले श्री अमोल कुंभारे यांनी वनातील अधिवास (forest habitation) बाबत काही शंका उपस्थित केल्या. पर्यावरण |

| | | |
|---|---|---|
| | अहवालात पुरविण्यात आलेली आहे हे खरे आहे काय? असल्यास पुरावा व स्पष्टीकरण देण्यात यावे. ते स्पष्टीकरण इतिवृतात घेण्यात यावे. | सल्लागार यांनी उत्तर दिले की प्रकल्प स्थानाच्या १० कि.मी. परिघात कुठलेही पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्र (Eco-Sensitive Zone) नाही. त्यामुळे हा बी-१ संवर्गात प्रकल्प मोडत असून राज्य सरकारच्या अखत्यारितील पर्यावरण अनुमती मंजूरी आहे. त्यावेळी श्री कुंभारे यांनी राखीव वनाबाबत मुददा परत उपस्थित केला असता पर्यावरण सल्लागार यानी सागितले की पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्र (Eco-Sensitive Zone) हे फक्त टीपेश्वर आहे. ते प्रकल्पापासून ३७ कि.मी. लांब आहे असे सांगितले. तसेच राखीव वन हे केंद्र व राज्य शासनाने अधिसूचित केलेले असावे लागते. प्रकल्प सुरु करताना वनखात्याचे मार्गदर्शन घेऊनच प्रकल्प स्थापन करण्यात आलेला आहे. त्याशिवाय वन खात्याचे ना हरकत प्रमाणपत्र हे बंधनकारक आहे. |
| ४) | पूर्वीपेक्षा चारपट उत्खनन लाईमस्टोन खाणीत होणार असल्याने सीएसआर निधीत त्याप्रमाणे वाढ करण्यात येऊन तो ग्रामपंचायतीस वळता करण्यात यावा. | सूचनेची नोंद घेण्यात आली. सदरहू विषय हा प्रकल्प प्रवर्तकांच्या अखत्यारितील नाही. |
| ५) | भाडेपट्टीच्या १० कि.मी. आत कोणतेही पर्यावरण संवेदनशील क्षेत्र किंवा उद्योगधंदे नाहीत अशी चुकीची माहिती दिली. ती दुरुस्त करण्यात यावी व चुकीची माहिती दिली म्हणून जनसुनावणीत खोटी माहिती दिली म्हणून पर्यावरण सल्लागार मेसर्स एन्व्हायरो टेक्नो, नागपूर यांच्यावर कारवाई करण्यात यावी. | पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की प्रकल्प स्थानाच्या १० कि.मी. परिघात कुठलेही पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्र (Eco-Sensitive Zone) नाही. त्यामुळे हा बी-१ संवर्गात प्रकल्प मोडत असून राज्य सरकारची मान्यता प्रकल्पास लागते. त्यावेळी श्री कुंभारे यांनी राखीव वनाबाबत मुददा परत उपस्थित केला असता पर्यावरण सल्लागार यानी सागितले की पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्र (Eco-Sensitive Zone) हे फक्त टीपेश्वर आहे. ते प्रकल्पापासून ३७ कि.मी. लांब आहे असे सांगितले. तसेच राखीव वन हे केंद्र व राज्य शासनाने अधिसूचित केलेले असावे लागते.<br>२) पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करताना गोएंका प्रकल्प हा बंद होता. आता सुरु झाल्याने त्याची नोंद अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अह्वालात घेण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| ६) | लाईमस्टोन क्षेत्रात वृक्षारोपण मोठ्या प्रमाणात जरी करण्यात आलेले असले, तर झाडे जगविण्यासाठी काय उपाययोजना अंगिकारणार आहात, याविषयी सविस्तर माहिती इतिवृतात देण्यात यावी. | लागवड केलेले वृक्ष जगण्यासाठी प्रकल्प प्रवर्तकांनी तरतुद केलेली आहे. |
| ७) | लाईमस्टोन वाहतुकीमुळे धुळीच्या कणांमुळे शेतक-यांच्या पीकाचे नुकसान होणार आहे. तरी शेतक-यांच्या पीकाची भरपाई रुपये २५०००/- हेक्टरप्रमाणे देण्यात यावी. | धुलीकणापासून शेतीचे संरक्षणासाठी शेतकी अधिकारी, शेतकी विभाग यांच्या निर्देशांप्रमाणे प्रस्ताव तयार करण्यात येईल. |
| ८) | विस्तारीकरण प्रकल्पात स्थानिक बेरोजगार युवक, युवती यांना प्राधान्य देण्यात यावे. | प्रकल्पात स्थानिक युवक, युवतींना प्राधान्य देण्यात येईल. |

२) <u>श्री सुनंदा रेड्डी, पर्यावरणवादी, हैद्राबादः-</u>

| **अनु. क्रं.** | **आक्षेप/सूचना/प्रश्न** | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | मी भारतातील पहिला वास्तववादी पर्यावरणवादी आहे की जो प्रकल्पाचे समर्थन करतो. आपल्या भारतात बेरोजगारी हे मोठे प्रदूषण आहे.पर्यावरण व आर्थिक विकास ह्यासाठी औद्योगिक विकासाची गरज आहे. भारतात ४० कोटी तरुण, तरुणी हे रोजगाराच्या प्रतिक्षेत आहेत. भारत सरकार व विविध राज्ये दरवर्षी ५-६ लाख रोजगार उपलब्ध करु शकतात. तर दरवर्षी एक कोटी लोक हे रोजगारासाठी उपलब्ध होतात. फक्त औद्योगिक सेक्टर हे फक्त प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध करुन देते. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| २) | त्यांनी सूचना केली की प्रकल्पात कंट्रोल ब्लास्टींग अंमलात आणावे. प्रकल्पातील साहित्याची वाहतुक ही टार्पोलिनने बंद केलेल्या ट्रक्समधून करण्यात यावी. तर तेथे प्रदूषण होणार नाही. या दोन गोष्टींची काळजी केल्यास प्रदूषण होणार नाही. प्रकल्पात शंभर लोकांना प्रत्यक्ष रोजगार मिळणार असेल, तर स्थानिक अप्रत्यक्ष ५००-६०० लोकांच्या | प्रकल्पात अत्याधुनिक उपकरणे कार्यान्वित करण्यात येणार असून प्रकल्पात कंट्रोल ब्लास्टींग अंमलात आणण्यात येईल. पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की कंट्रोल डिले डिटेनोटर्सव्दारे control blasting करण्यात येणार आहे. प्रकल्पात स्थानिकांनाच प्राधान्य देण्यात येणार आहे. |

| | | |
|---|---|---|
| | व्यवसायात वाढ होईल. त्याचप्रमाणे उत्पादनामुळे शासकीय उत्पन्नात वाढ व ग्रामपंचायतीस कराचे उत्पन्न वाढणार आहे. हा समाजाला फायदाच आहे. माझ्या मते महाराष्टात खाणींच्या उद्योगामुळे शासनास दरवर्षी ५०,००० कोटी उत्पन्न मिळते. तरी शासनाने सदरहू प्रकल्पास मान्यता द्यावी. | |
| ३) | प्रकल्पाच्या १० कि.मी. परीघ क्षेत्रातील आरोग्य सद्यस्थितीबाबत सर्वेक्षण, स्थानिक पीकांच्या नमुन्याचे सर्वेक्षण, भूजल पातळीची सद्यस्थिती याचे सर्वेक्षण करण्यात यावे. त्याचा अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात समावेश व्यवस्थापनाने करावा. | पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की श्री सुनंदा रेड्डी यांनी उपस्थित केलेले मुद्द्यांची नोंद घेण्यात आलेली आहे. त्यांनी भूगर्भातील जलाबाबत सूचनांवर उत्तर देताना सांगितले की भारत सरकारने भूगर्भातील पाण्याचा महत्त्व दिलेले आहे. पर्यावरण सल्लागार यांनी परिसरातील आरोग्य सद्यस्थितीबाबत सर्वेक्षण सूचनेचे स्वागत करुन सांगितले की प्रकल्प प्रवर्तक हे वेळोवेळी आरोग्य शिबिरांचे आयोजन करणार आहे. |
| ४) | जरी खाणकाम उद्योगात हरितपट्टा विकसनाच्या काही मर्यादा आहेत, तर शक्य ते मियाबाकी वृक्षारोपण करण्यात यावे. ते निसर्गालाही उपयुक्त आहे. त्याचप्रमाणे परिसरातील गावात व रस्याच्या दोन्ही बाजूस वृक्षारोपणाची गरज आहे. त्यात फळे असलेले वृक्ष व औषधी वनस्पती लावण्यात याव्यात. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ५) | प्रकल्प व्यवस्थापनाने एक समन्वयक समिती (Co-ordination Committee) गठीत करावी. त्यात प्रकल्प व्यवस्थापन, सरंपच, स्थानिक स्वराज्य संस्था, प्रदूषण नियंत्रण अधिकारी यांचा समावेश करण्यात यावा. समितीने आवश्यक असलेल्या सामाजिक योजना (Demand Oriented Work) राबवाव्यात. फक्त लक्ष्यपूर्ती सामाजिक योजना (Target Oriented Work) राबवू नयेत. सीएसआर निधी हा आवश्यक असलेल्या सामाजिक योजना (Demand Oriented Work) साठी खर्च करण्यात याव्यात. प्रकल्पात जल संवर्धन व साठवण | सूचनेची नोंद घेण्यात आलेली आहे. पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की तसा प्रस्ताव आम्ही १०.३ या शिषर्काखाली मसुदा अहवालात केलेला आहे. |

| | | |
|---|---|---|
| | योजना अंगिकारण्यात याव्यात, प्रकल्पातर्फे प्रकल्प परिसरात आरोग्य रोगप्रतिकारकशक्ती जागरुकता कार्यक्रम वेळोवेळी राबविण्यात यावा. करोनामुळे याची गरज आपल्याला कळली आहे. | |
| ६) | भारतात पींकावरिल कीटकनाशक फवारणीमुळे त्याचप्रमाणे अन्नातील भेसळीमुळे मोठ्या प्रमाणात प्रदूषण होते. भारतातील एनजीओज् हे प्रदूषणासाठी उद्योगांना जबाबदार धरतात. भारतातील फक्त १५% लोकच उद्योग प्रदूषणाला तोंड देत आहेत. तरी याबाबत प्रशिक्षण योजना राबविण्यात याव्यात. | सूचनेची नोंद घेण्यात आलेली आहे. |

**३) श्री अवधुत महादेवराव जवळकर,माजी सरपंच,वांजरी,तालुका-वणी,जिल्हा-यवतमाळ:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | वणी ते राजोर हा परिसर, या प्रकल्पापासून चार कि.मी. अंतर क्षेत्रावर (वांजरी ते चार कि.मी. अंतर) संपूर्ण शेती वसलेली आहे. वांजरी येथील ही खाण १-१.५ कि.मी, अंतरावर असल्यामुळे प्रकल्प स्थानावर जाणा-या रस्त्याचे खडीकरण करण्यात यावे अशी ग्रामस्थ म्हणून विनंती. | सूचनेची नोंद घेण्यात आलेली असून रस्त्याचे खडीकरण करण्यात येणार आहे. |

**४) सौ. सुवर्णा अंबादास देरेकर,सरपंच, वांजरी ग्रामपंचायत, तालुका-वणी,जिल्हा-यवतमाळ:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | प्रकल्पात जरी वृक्षारोपण करण्यात आले, तरीही ते वृक्ष जगण्यासाठी काय उपाय योजना | ६.२५ लाख निधी वृक्षारोपणासाठी राखीव ठेवण्यात आलेला असून १२५० वृक्ष लावण्यात येतील. वृक्ष जगविण्यासाठी सर्व उपाय करण्यात येतील. ट्री गार्ड |

| | | |
|---|---|---|
| | करण्यात आल्या? त्यांनी मत मांडले की त्या वृक्षांना ट्री गार्ड व कुंपण लावण्यात यावे. | व कुंपण पर्यावरण व्यवस्थापन योजनेखाली तरतुद केलेली आहे |
| २) | प्रकल्पाकडे जाणा-या रस्त्याचे प्रथम डांबरीकरण करण्यात यावे व नंतरच वाढीव क्षमतेस परवानगी देण्यात यावी. | रस्त्याचे डांबरीकरण करण्यात येईल. |
| ३) | कंपनीच्या माध्यमातून वेळोवेळी आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित करण्यात यावीत. त्याचप्रमाणे समाधान शिबिरे आयोजित करण्यात यावीत. | कंपनीकडून याबाबत आर्थिक तरतुद करण्यात येऊन वेळोवेळी आरोग्यशिबिरे भरविण्यात येतील. याबाबतची संपुर्ण अंतिम पर्यावरण अहवालात माहिती देण्यात येईल. |
| ४) | वांजरी येथील आराध्यदैवत काशीनाथ देवस्थानच्या रस्त्याचे डांबरीकरण करण्यात यावे. | सूचनेची नोंद घेण्यात आलेली आहे. |
| ५) | वार्षिक कर स्वरुपात विकास निधी म्हणून एक लाख नमुद करण्यात यावेत. | पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की ग्रामपंचायतीस एक लाख रुपये विकास निधी देण्याबाबतचा विषय ईआयए अधिसूचनेत येत नाही. त्यामुळे त्याचा प्रस्ताव तयार करता येणार नाही. |
| ६) | ब्लास्टिंगमुळे पाण्याचे क्षेत्र हे खोलवर जात असते. त्याकरिता पाण्याची साठवण व विविध उपाययोजना राबविण्यात याव्यात. | पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की केंद्रीय भूगर्भ जल प्राधिकरण, भारत सरकार यांनी प्रकल्पासाठी २.० घनमीटर पाणी ऊपसा करण्याची परवानगी दिलेली आहे. जल पुनर्भरणासाठी त्यांनी दोन रिचार्ज खड्डे करण्यास सांगितले आहे. ते तयार करण्याचा प्रस्ताव टाकलेला आहे. त्याचप्रमाणे ६.२५ लाख निधी वृक्षारोपणासाठी राखीव ठेवण्यात आलेला असून १,२५० वृक्ष लावण्यात येतील. |
| ७) | खाणक्षेत्रात व रस्त्याच्या दोन्ही बाजूस बांबू, कडुनिंबाची झाडे लावण्यात यावीत. | सूचनेची नोंद घेण्यात आलेली आहे. |

**५) <u>श्री बंडू भाऊजी शिलाम, माजी सरपंच, वांजरी ग्रामपंचायत, तालुका-वणी,जिल्हा-यवतमाळ:-</u>**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | याठिकाणी डोलोमाईट खाणीचे विस्तारिकरण होत आहे. मात्र कंपनीच्या खाणकामामुळे गावाला हादरे बसत आहेत. | पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की कंट्रोल डिले डिटेनोटर्सव्दारे control blasting करण्यात |

| | | |
|---|---|---|
| | | येणार आहे. कंपनीने धक्के मोजण्यासाठी कायमचे स्थान (station) ठरविले आहे |
| २) | शेतक-यांचे जनावरे जर त्यांच्या क्षेत्रात आले, तर ते कोंडवाड्यात नेऊन कोंडतात. तर शेतक-यांच्या जनावरांसाठी ही जमिन अधिकृतपणे आम्हांला पाहिजे. ही महसूल खात्याची जमिन असून ती स्थानिक शेतक-यांच्या जनावरांसाठी आम्हांला पाहिजे. कारण शेतकरी हा सर्वांना जगवत असतो. मात्र शेतक-यांच्या जनावरासाठी जागा कुठेच राहिली नाही. त्याचे अवलोकन करण्यात यावे व ही जागा आम्हा शेतक-यांना अधिकृतपणे देण्यात यावी | अध्यक्ष यांनी सांगितले की बैठकीत सरकारी जमिनीचा मुद्दा उपस्थित झालेला आहे. तर महसूल खात्याकडून त्याची तपासणी होईल. शासनाच्या नियमाप्रमाणे योग्य ती कार्यवाही त्वरित करण्यात येईल. |
| ३) | प्रकल्प प्रवर्तकांना कुठलीही परवानगी ही देण्यात येऊ नये. स्थानिकांची पाण्याची समस्या ही भीषण आहे. कंपनीच्या ट्रकसाठी रस्ता नाही. स्थानिक शेतकऱ्यांच्या रस्त्यातून ट्रक्स जातात. वृक्षारोपण कुठेही केलेले नाही. तरी गावाजवळील आणि हीही जागा प्रकल्पास देऊ नये. त्यांनी सांगितले की ते सरपंच असलेल्या कार्यकाळात जेवढी पेयजल पाणीपुरवठा योजना झाल्या, त्याचेच पाणी वांजरी गावास मिळत आहे. | रस्त्याच्या डांबरीकरणाबाबत उत्तर देण्यात आलेले आहे. |

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना काही आक्षेप, सूचना असल्यास त्या उपस्थित करण्याचे आवाहन केले. त्याचप्रमाणे कोणालाही लेखी निवेदन, आक्षेप सादर करायचे असल्यास त्या देण्याचे आवाहन केले. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनीही उपस्थितांना आक्षेप, सूचना नोंदविण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता. अध्यक्ष यांनी प्रकल्प प्रवर्तकांना उपस्थित प्रश्नांना उतरे देण्याची सूचना केली.

प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार खालीलप्रमाणे उत्तरे दिली:-

१) श्री अमोल कुंभारे यांनी डीएमएफ म्हणजे District Mining Fund बाबत प्रश्न विचारला आहे. प्रत्येक टनामागे १०% रॉयल्टी ही डीएमएफला जाते. जिल्हाधिकारी, यवतमाळ याच्या अखत्यारित तो निधी असतो. प्रकल्प प्रवर्तकांचा त्या विनियोगाबाबत काहीही संबंध येत नाही.

श्री अमोल कुंभारे यांनी वनातील अधिवास (forest habitation) बाबत काही शंका उपस्थित केल्या. पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की प्रकल्प स्थानाच्या १० कि.मी. परिघात कुठलेही पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्र (Eco-Sensitive Zone) नाही. त्यामुळे हा बी-१ संवर्गात प्रकल्प मोडत असून राज्य सरकारचा प्रकल्प आहे. त्यावेळी श्री कुंभारे यांनी राखीव वनाबाबत मुददा परत उपस्थित केला असता पर्यावरण सल्लागार यानी सागितले की पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्र (Eco-Sensitive Zone) हे फक्त टीपेश्वर आहे. ते प्रकल्पापासून ३७ कि.मी. लांब आहे असे सांगितले. तसेच राखीव वन हे केंद्र व राज्य शासनाने अधिसूचित केलेले असावे लागते. प्रकल्प सुरु करताना वनखात्याचे मार्गदर्शन घेऊनच प्रकल्प स्थापन करण्यात आलेला आहे. त्याशिवाय वन खात्याचे ना हरकत प्रमाणपत्र हे बंधनकारक आहे.

२) लागवड केलेले वृक्ष जगण्यासाठी प्रकल्प प्रवर्तकांनी तरतुद केलेली आहे. धुलीकणापासून शेतीचे संरक्षणासाठी शेतकी अधिकारी, शेतकी विभाग यांच्या निर्देशांप्रमाणे प्रस्ताव तयार करण्यात येईल.

३) श्री सुनंदा रेड्डी यांनी उपस्थित केलेले मुद्द्यांची नोंद घेण्यात आलेली आहे. त्यांनी भूगर्भातील जलाबाबत सूचनांवर उत्तर देताना सांगितले की भारत सरकारने भूगर्भातील पाण्याचा महत्त्व दिलेले आहे. त्यांनी परिसरातील आरोग्य सद्यस्थितीबाबत सर्वेक्षण सूचनेचे स्वागत करुन सांगितले की प्रकल्प प्रवर्तक हे वेळोवेळी आरोग्य शिबिरांचे आयोजन करणार आहे.

४) सरपंच, वांजरी यांनीही विशिष्ट कालावधीनंतर आरोग्य शिबिरे आयोजित करण्याची सूचना केली. पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की केंद्रीय भूगर्भ जल प्राधिकरण, भारत सरकार यांनी प्रकल्पासाठी २.० घनमीटर पाणी ऊपसा करण्याची परवानगी दिलेली आहे. जल पुनर्भरणासाठी त्यांनी दोन रिचार्ज खड्डे करण्यास सांगितले आहे. ते तयार करण्याचा प्रस्ताव टाकलेला आहे. त्याचप्रमाणे ६.२५ लाख निधी वृक्षारोपणासाठी राखीव ठेवण्यात आलेला असून १२५० वृक्ष लावण्यात येतील.

५) श्री सुनंदा रेड्डी यांनी सूचना केली की एक समन्वयक समिती गठित करण्यात यावी तर तसा प्रस्ताव आम्ही १०.३या शिषर्काखाली मसुदा अहवालात केलेला आहे. ब्लास्टींग हे Control Blasting करण्यात यावे. पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की कंट्रोल डिले डिटेनोटर्सव्दारे control blasting करण्यात येणार आहे. वाहतुकीच्या वेळी टार्पोलिनने बंद करुन ट्रकमधून वाहतुक करण्यात येईल. भारताची जे मिनरल पाण्याबाबत धोरण आहे, ते राबविण्यात येईल. त्यांनी औद्योगिक विकासास पाठिंबा दिला त्याचे आम्ही स्वागत करतो.

६) सरपंच, वांजरी यांनी आरोग्य शिबिराबाबत प्रश्न विचारला, त्यास पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात अंदाजपत्रकासह आरोग्यशिबिराचा कार्यक्रमाचा समावेश करण्यात येईल.

७) श्री जवळकर यांनी रस्त्याचे खडीकरण करण्याची सूचना केली. त्याचा प्रस्ताव आम्ही केलेला आहे.

८) सौ. दरेकर, सरपंच यांनी वृक्ष जगविण्यासाठी काही सूचना केल्या, त्यात ट्री गार्ड व कुंपण बांधण्याची सूचना केली. तरी आम्ही पर्यावरण व्यवस्थापन योजनेखाली केलेली आहे. त्यांनी ग्रामपंचायतीस एक लाख रुपये विकास निधी देण्याबाबत सूचना केली. तो विषय ईआयए अधिसूचनेत येत नाही. त्यामुळे त्याचा प्रस्ताव तयार करता येणार नाही. त्यांनी शंका उपस्थित केली की ब्लास्टींगमुळे पाण्याची पातळी कमी होईल. तर येथे २.० घनमीटर पाणी उपसा करण्याची परवानगी केंद्र सरकारने दिलेली आहे. जल पुनर्भरणासाठी त्यांनी दोन रिचार्ज खड्डे करण्यास सांगितले आहे. ते तयार करण्याचा प्रस्ताव टाकलेला आहे. दरवर्षी भारत सरकारला त्याचे अनुपालन (compliance) करावे लागते. जर अनुपालन केले असेल, तर दोन-दोन वर्षांची परवानगी मिळते, नाही तर मिळत नाही. सौ. जेणेकर यांनी सूचना केल्याप्रमाणे स्थानिक प्रजाती असल्याने प्रकल्प अधिकारी यांनीही कडुलिंब संवर्धनाचा मानस केलेला आहे.

९) माजी सरपंच श्री शिलाम यांना जे आक्षेप नोंदविले, त्यास उत्तर देताना पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की कंपनीने धक्के मोजण्यासाठी कायमचे स्थान (station) ठरविले आहे. माजी सरपंच यांनी ही जागा महसुल विभागाची आहे असे सांगितले. सदरहू विषय ही जिल्हा प्रशासनाचा आहे. ते याबाबत योग्य तो निर्णय घेतील. रस्ता खडीकरण, वृक्ष लागवड याबाबत उत्तर देण्यात आलेले आहे.

बैठकीचा समारोप करताना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की आज श्रीमती फैमिदा परवीन बी. खान, वांजरी लाईमस्टोन व डोलोमाईट खाणीची उत्पादन क्षमता विस्तारिकरणाच्या जनसुनावणीसाठी एकत्रित आलो. त्यांनी सर्व उपस्थित केलेल्या सूचनांचा, व त्यास पर्यावरण सल्लागार यांनी दिलेल्या उत्तराचा ऊहापोह केला. त्यांनी सांगितले की बेठकीत सर्वांना लेखी व तोंडी सूचना, आक्षेप उपस्थित करण्याची संधि दिली. काहींनी बैठकीअगोदर व येथेही लेखी निवेदने सादर केलेली आहेत. ती सर्व लेखी निवेदने अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व बैठकीच्या इतिवृतान्तासोबत शासनास सादर करण्यात येतील.

अध्यक्ष यांनी ऊहापोह करताना सांगितले की प्रथम श्री. अमोल महादेव कुंभारे, उपसरपंच, वांजरी यांनी लेखी व तोंडी निवेदनात डीएमएफ निधीपासून सीएसआर निधिपर्यंत सर्व विषय घेतले आहेत. श्री सुनंदा रेड्डी यांना प्रकल्पाचे समर्थन करताना काही बाबींचा उल्लेख केला, जसे की ठराविक मुदतीत आरोग्य शिबिरे आयोजित करणे, हरितपट्टा विकास करताना औषधी व फळ लागणारे वृक्ष लावणे, पावसाचे पाणी संवर्धन याबाबत सूचना केलेल्या आहेत.

माजी सरपंच अवधुतराव जवळकर यांनी वणी ते राजुरा या रस्त्याचे खडीकरण करण्यात यावे ही सूचना केली.

तर सौ. सुवर्णा दरेकर, सरपंच, वांजरी यांनी वृक्ष लागवडीबरोबरच त्याचे संवर्धनही झाले पाहिजे. त्याबाबत व वार्षिक विकास निधी याबाबत सूचना केल्या.

माजी सरपंच श्री शिलाम यांनी त्यांचे विषय मांडले, कंट्रोल ब्लास्टिंग करावे, गावाला हादरे बसू नये. या सर्वांची उत्तरे पर्यावरण सल्लागार यांनी दिलेली आहेत.

अध्यक्ष यांनी प्राप्त झालेल्या लेखी निवेदन सादर केलेल्या व्यक्ती व संस्थांची नांवे वाचली. त्यांनी सांगितले की लेखी निवदेनाची उत्तरे प्रकल्प प्रवर्ताकाकडून घेऊन ती शासनास व संबंधित व्यक्तीस सादर करण्यात यावीत. त्यांनी सांगितले की प्रगती एनव्हायमेंटल सोसायटी, श्री विजय पिदुरकर माजी सदस्य, जिल्हा परिषद. यवतमाळ, सरपंच, ग्रामपंचायत, वांजरी, उपसरपंच ग्रामपंचायत वांचरी, ट्रु व्हिजन फॉर एनव्हायमेंट डेव्हल्पमेंट, सिध्दिविनायक एनव्हायमेंट एण्ड सेंटर सोसायटी, सुभाष चंद्रगौस फाऊन्डेशन, विकलांक कासर यांचे निवेदन प्राप्त झालेले आहे. सेव्ह बर्ड, सेव्ह एनिमल एनव्हायमेंट सोसायटी, ग्रीन सोशल सोसायटी सर्व्हिसेस, संकल्प, पॉवर ऑफ नेचर डेव्हल्पमेंट सोसायटी, अर्थ ग्रीन डेव्हल्पमेंट सोसायटी यांचेही निवेदन प्राप्त झालेले आहे. अध्यक्ष यांनी सांगितले की संबंधित व्यक्ती व संस्था यांना प्रकल्प अधिकारी यांच्याकडून उत्तरे प्राप्त झाल्यानंतर ते सादर करण्यात येतील.

अध्यक्ष यांनी सांगितले की बैठकीत सरकारी जमिनीचा मुद्दा उपस्थित झाला. तर महसूल खात्याकडून त्याची तपासणी होईल आणि शासनाच्या नियमाप्रमाणे योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

अध्यक्ष यांनी सर्वांचे आभार मानले व जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

माननीय अध्यक्षांचे आभार मानून जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

प्राप्त झालेले १२ सूचना,आक्षेप सोबत जोडलेले आहेत.

| | | |
|---|---|---|
| **(अतुल सातफळे)**<br>समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, चंद्रपूर | **(अ. मा. करे)**<br>सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर | **(ललितकुमार वऱ्हाडे)**<br>अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा अपर जिल्हादंडाधिकारी, यवतमाळ |